SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL

Email id : aiirjpramod@gmail.com

www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

# मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

आणि

विनायकराव पाटील शि. प्र. मं. सं.

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

**मराठी विभाग**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

(दि. १२ फेब्रुवारी २०२२)

**( Special Issue No.105 )**

**Chief Editor**

Mr. Pramod P. Tandale

**Executive Editor**

Prof. Dr. Sunita Shinde

Principal,

Arts , Commerce and science College, Kannad

**Co-Editor**

Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

HOD Marathi ,

Arts , Commerce and science College, Kannad

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | P N |
|---|---|---|---|
| 35. | भास्कर ढोके | बकऱ्याची बॉडी - समकाळाचे भान असलेली कथा | 14 |
| 36. | डॉ. रमेश अर्जुन शिंदे | जागतिकीकरणातील अस्वस्थ वर्तमानाच्या कथा : ब्लॉगच्या आरशापल्याड | 15 |
| 37. | श्री. राहुल देवीदासराव फाटकर | बाबाराव मुसळे यांच्या कथेतील स्त्रीजीवन | 15 |
| 38. | सूर्यकांत श्रीधर आदलिंगे | जयंत पवार यांचा कथासंग्रह : वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा | 16 |
| 39. | डॉ. एम. ए. कव्हळे | जागतिकीकरणाचे वास्तव चित्रण करणारी कथा : ब्रँड फॅक्टरी | 167 |
| 40. | डॉ. कैलास इंगळे | टंचाई - उद्ध्वस्त ग्रामसंस्कृतीचा आलेख | 172 |
| 41. | डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक | आसाराम लोमटे यांच्या कथेतील 'आलोका'तील लोक | 175 |
| 42. | प्रा. डॉ. तुळशीराम उकिरडे | 'फुलवा' कथा संग्रहातील स्त्री वेदना | 179 |
| 43. | प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर | समकालीन जीवनातील नात्याचा वेध घेणारी कथा : मोराची बायको - | 184 |
| 44. | ललिता मानसिंग गोपाळ | राजन खान यांच्या :'बाईजात' कथासंग्रहातील स्त्रीजीवन | 187 |
| 45. | प्रा. शरद बोराडे | बदलत्या ग्राम वास्तवतेचा 'दाखला' | 190 |
| 46. | प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | 'एका सुगीची अखेर' मधील कैलास दौंड यांची कथा : एक दृष्टिक्षेप | 193 |
| 47. | प्रा. डॉ. यशवंत हाके | ग्रामीण जीवनानुभवांचा संवेदनशील आविष्कार : पोशिंदा | 196 |
| 48. | डॉ. प्रशांत गुणवंतराव चौधरी | कलात्मकता आणि सामाजिकतेचा सुरेख संगम : रस्ता आणि इतर कथा | 201 |
| 49. | प्रोफेसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | मधुकर क्षीरसागर यांच्या कथांचे स्वरुप | 204 |
| 50. | डॉ. सी. एस. आवारे | स्त्रीवादी कथेमागील भूमिका | 207 |

# बदलत्या ग्राम वास्तवतेचा 'दाखला'

**प्रा. शरद बोराडे**
मराठी विभाग,
श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना.

साहित्याचा विषयच मुळात समग्र मानवी जीवन आहे. या मानवी जीवनानुभवातूनच साहित्य आकाराला येते म्हणजे या जीवनानुभावाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. लेखक ज्या समाजात राहतो, तो समाज, तेथील रितीरिवाज, त्याच्या भोवतालची परिस्थिती, विचारधारा आणि त्या लेखकाची काही व्यक्तिवैशिष्ट्ये या सर्वांचा विचार साहित्यात येत असतो. विविष्ट समाजातील वा भूप्रदेशातील 'साहित्य' ही कल्पनाच त्या समाजाचे वा भूप्रदेशाचे सांकृतिक अंग असते. साहित्य निर्माण करणारा साहित्यिक या परंपरेच्या चौकटीतच कार्य करीत असतो. या वेळी त्याची सामकालाशी बांधिलकी असते. ही समकालीन वांधीलकीच साहित्याला सांकृतिक संदर्भ प्राप्त करून देत असते. त्या प्रदेशाची स्वतंत्र ओळख करून देत असते.

शोधनिबंधाचा विषय 'समकालीन कथालेखक विजय जाधव यांचा दाखला' हा कथासंग्रह असून दोन दशकातील ग्रामीण जीवनातील स्थित्यंतराचा परिणाम म्हणूनही या कथासंग्रहाकडे आपणास पाहता येईल. समकालीन समाजजीवनाचा वाङ्मयीन दस्तऐवज म्हणून या सर्व कथांची नोंद घेता येईल. मराठवाड्यातील समकालीन कथालेखक म्हणून त्यांची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यांचा २०१४ ला प्रसिद्ध झालेला हा पहिलाच कथासंग्रह असून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा बाबुराव बागुल पुरस्कारही या कथासंग्रहास मिळालेला आहे. यानंतर त्यांची 'पांढरकवड्या' नावाची कांदबरी प्रकाशित आहे. नदीपात्रातील वाळू आणि त्या भोवती फिरणारे अर्थकारण तसेच राजकारण हा या कादंबरीचा विषय आहे. पाण्याच्या पातळीसोबत सर्वच घटकांची नैतिक पातळी खालावत गेल्यामुळे गावाचे गावपण हरवत गेले. मानवी मन संवेदनाहीन होत गेले. गाव विविध समस्यांच्या चक्रात सापडले आहे. या चक्रातून त्यांच्या कथा जन्माला आल्या आहेत.

१९९० ला भारताने खुले आर्थिक धोरण स्विकारले आणि त्यातून जागतिकीकरण जन्माला आले. याचाच परिणाम म्हणून ग्रामीण जीवनात प्रचंड बदल होऊन महाराष्ट्राचे समाजजीवन ढवळून निघाले. संरमजामशाही मानसिकतेला हादरा बसला. पारंपरिक समाजव्यवस्था कोलमडून नव्या बदलला सामोरे जाणे भाग पडले. एक नवी परावलंबी ग्रामव्यवस्था समाजात रुजू लागली. नवनवीन बी बियाणे, रासायनिक खते, यंत्राचा वापर, किटकनाशके, फवारण्या, मजुरीच्या दरात प्रचंड वाढ व उत्पादित मालाला मिळणारा अल्प बाजारभाव या अशा अनेक कारणांमुळे शेती करणे महाग होत गेले. तसा शेतकरी उद्धवस्त होत गेला. शेतकरीविरोधी धोरणामुळेही त्याच्यावर परिणाम झाला. मोबाईल, इंटरनेट व टिव्ही चॅनलचा धुमाकूळ यामुळे समाजात चंगळवाद व भोगवाद वाढला.याचेही दुष्परिणाम या समाजावर झालेले दिसून येतात. शेतकऱ्यांसाठी निर्माण झालेल्या योजना त्याच्याच जीवावर उठल्या. सरकारी कर्मचाऱ्यांचा भ्रष्टाचार व योजनात हिस्सेदारी वाढली तसा तो कर्जत अधिकच बुडत गेला.

ग्रामीण माणूस शिक्षणाविषयी मोठी आस्था बाळगून होता, परंतु सुशिक्षित माणसामुळेच त्याचा भ्रमनिरास झाला. शिक्षणातील जीवघेणी स्पर्धा, बेकारी, शिक्षणाचे बाजारीकरण, भ्रष्टाचार, भयग्रस्तता व दडपशाही हे प्रश्न तीव्र स्वरुपात असून दुसरीकडे सुशिक्षित माणसाने नोकरीनंतर गावाला व घरादारापासून स्वतःला तोडून घेणे, स्वत:च्या गरजांना अधिक महत्त्व देणे, नात्या-नात्यातील स्वार्थीपणा, फोलपणा व अविश्वासाचे वातावरण यामुळे ग्रामीण माणसाचा शिक्षणाविषयी भ्रमनिरास झाला. या सर्व प्रश्नांचा उभा आडवा छेद साहित्याच्या माध्यमातून करण्याचे काम मराठवाड्यातील समकालीन कथालेखकांनी केले आहे. समकालीन पिढीतील भारत काळे हे महत्त्वाचे नाव आहे. आसाराम लोमटे यांचा 'इडा पिडा टळो' व 'अलोक' या कथासंग्रहातून वर्तमान व्यवस्थेचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण या कथासंग्रहातून आले आहे. सुरेंद्र पाटील यांचा अंगारभोंगा, विजय जावळे यांचा मिरगी पेर, गेणू शिंदे यांचा चक्रव्यूह तसेच नारायण शिंदे, राजेंद्र गहाळ ही नावेही महत्त्वाची आहे. भास्कर बडे, सुरेश जाधव, प्रभाकर हरकळ, नारायण शिंदे, गणेश आवटे तर स्त्री कथाकारात मधु सावंत, ललिता गादगे ही नाव ठळकपणे आपल्यासमोर येतात.

समकालीन महत्वाचा कथालेखक म्हणून विजय जाधव हेही नाव महत्वाचे आहे. त्यांची प्रत्येक कथा समकालीन कालखंडाचा दस्ताऐवज म्हणावा लागेल, इतकी महत्वाची आहे. 'नाथाच्या संसाराचा वाफा कच्चा राहिला होता', अशा अर्थपूर्ण वाक्यांनी कुटुंबाची, गावाची एकूण समाजाची मर्यादा ते दाखवून देतात. संस्काराअभावी आणि वाईट संगतीमुळे ग्रामीण भागातील छोटी - छोटी कुटुंबे व्यसनाधीन होऊन कशी देशोधडीला लागली याचे वास्तव चित्रण 'गाभ्यामोड' या कथेतून केले आहे. ग्रामीण भागातील वाढलेली अनैतिकता, व्यसनाधीनता आणि त्यातून उद्भवलेले आजार याचेही परिणामकारक चित्रण गाभ्यामोड या कथेतून आले आहे. नाथा आणि मंजुळाच्या उध्वस्त संसाराची कहाणी ही कथा मांडते. स्वार्थासाठी नात्यालाच कसा सुरुंग लावला जातो हे वास्तव 'इसार'कथेतून मांडले आहे. मुलगा आणि नवरा नसलेल्या ग्रामीण भागातील कुटुंबाची झालेली दीन अवस्था या कथेतून मांडलेली आहे. 'मुद्दल'कथेतून ग्रामीण भागातील सावकारकी आणि त्यातून कुटुंबातच कसा कलह निर्माण होतो याचे नेमकेपणाने चित्रण आले आहे. लोभ कुठलाही असो स्वत:मध्ये निर्माण झाल्यावर त्याचे स्वत:वर आणि इतर घटकांवर कसे परिणाम होतात, त्यातून माणूस कसा एकाकी पडतो तसेच कुटुंबातील समतोल ठेवण्यास कसा अपयशी होतो याचे नेमकेपणाने चित्रण आले आहे.

'वाटणी' या कथेत लेखकाने एका कुटुंबाच्या माध्यमातून विभक्त होत जाणती शेती, विभक्त होत जाणारी नाती, नात्यातील दुरावा - द्वेष आणि त्याचे दुष्परिणाम या कथेतून अधोरेखित केले आहेत. या विभक्त होण्याला जसे कुटुंब जबाबदार आहे तसे बाहेरचेही घटक जबाबदार आहे हे लेखक सूचकतेने सांगतो. 'प्रश्न' कथेतून ग्रामीण भागातील वेगवेगळ्या दुष्ट प्रवृत्तीचे चित्रण येते. पायात पाय घालणे, पाय ओढणे अगदी साध्या साध्या प्रसंगातून लेखक सांगून जातो. नोकरी संदर्भातील येणारे कॉल उमेदवारापर्यंत पोहचू द्यायचे नाही, त्याचा विजय म्हणजे आपला पराभव ही दुष्ट वृत्ती आधुनिक शिक्षणानेही कमी झाली नाही असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. संस्काराअभावी, नियोजनाअभावी, नेमकेपणाअभावी निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा धांडोळा 'प्रश्न' कथेत आलेला आहे. 'उधारी' या कथेतूनही मध्यमवर्गीय कुटुंबातील पवित्र नाती संस्काराअभावी कशी उध्वस्त होतात हेच सांगितले आहे. एकुलता एक मुलगा संस्कारी आईवडील; परंतु संस्कारी सून नसल्यामुळे तसेच आपल्या श्रीमंतीचा अंहकार असल्यामुळे एका चांगल्या कुटुंबाची वाताहत यात मांडली आहे. सुनेने सासूला समजून घ्यावे; परंतु इथे तसे होताना दिसत नाही. स्त्री स्त्रीला समजून घेत नाही. शिक्षणाने ज्ञान मिळाले, परंतु संस्कार मिळाले नाही, असाही भाव या कथेतून दिसून येतो.

'चटका' या कथेतून ग्रामीण भागातील आत्महत्यांवर प्रकाश टाकला आहे. कुटुंब म्हटले की, चढउतार आलेच; परंतु त्यांवर मात समतोलपणानेच करता येते. यात मुख्य भूमिका कुटुंबप्रमुखाचीच महत्त्वाची असते. तोच परिपूर्ण नसेल तर प्रश्न निर्माण होणारच. आपले स्वप्न मुलात पाहणे, मुलांच्या आवडीनिवडी समजून न घेतल्यामुळे कुटुंबात चटका लावणारी घटना म्हणजे मुलाने सायकल न दिल्यामुळे फाशी घेणे. कुठेतरी समतोल बिघडल्यामुळे, समजून न घेतल्यामुळे अशा विघातक घटना ग्रामीण कुटुंबात नेहमीच घडतात. याचा वास्तव वेध या कथेतून घेतला आहे. कुटुंबप्रमुखाच्या अतिरेकी रागामुळे निर्माण होणारे प्रश्न चटका कथेतून आलेले आहे. 'उभारी' कथेतून कोल्हाटी समाजाचे जीवन आले आहे. समकालीन काळात पैशालाच महत्त्व आहे. पैसाच सर्वस्व आहे. जोपर्यंत पैसा तोपर्यंत सत्ता असेच समीकरण आज चालू आहे. पैशाच्या जोरावर या कथेतील नायकाकडे राजकारणातील महत्त्वाची पदे येतात; परंतु प्रस्थापित समाजाला हे पटत नाही. संधी पाहून प्रस्थापित समाज या समाजाला राजकारणातून पायउतार करतो. राजकारणातही प्रस्थापित जातीचे महत्व आणि वर्चस्व अन्य जातींना जाणीवपूर्वक पाठीमागे ठेवते याचेही चित्रण येते. 'सुतक' कथेतून विठोबाच्या माध्यमातून वाळीत टाकलेल्या कुटुंबाची कहाणी आलेली आहे. या कथेचा नायक विठुबा लग्न न जमण्यामध्ये एक महत्त्वाचे कारण म्हणजे या कुटुंबाला गावाने वाळीत टाकलेले असते. त्यामुळे विठोबाचे लग्न राहिलेले असते. त्यामुळे तो गावचा सांगकाम्याच होतो. सांगकाम्यावृत्तीमुळे त्याचा होणारा मृत्यू लेखकाने उभा केला आहे. एकाकी पडलेल्या माणसाचा गाव कसा उपयोग करून घेते याचेही चित्रण या कथेत येते. मृत्यूपेक्षा पैसाच महत्त्वाचा ही मानवाची बदललेली मानसिकता ही कथा सांगून जाते. 'इलेक्शन' कथेतून खालावलेल्या राजकारणाची पातळी अधोरेखित होते. इलेक्शन कोणतेही असो सुस्वभावी आणि सरळमार्गी असणाऱ्यांसाठी धोक्याचेच होऊन बसले आहे. पतसंस्थेच्या राजकारणात एका सरळमार्गी शिक्षकाचा घात केला जातो. त्याच्या पाठीत खंजीर खुपसून कसे उध्वस्त केले जाते, याचे प्रत्ययकारी चित्रण इलेक्शन कथेत आले आहे. राजकारण कुठलेही असो, तिथे अविवेकी माणसाचाच भरणा जास्त झालेला आहे. त्यामुळे सरळमार्गी माणसाची होणारी ससेहोलपट आणि त्याच्या कुटुंबावर होणारे दुष्परिणाम ही कथा सांगून जाते. पुराचे पाणी घरात घुसल्यानंतर जातीची प्रतिष्ठा

महत्त्वाची आहे. असे मानणारे लोकही आहेत. 'वरड' या कथेतून हे चित्रण प्रत्ययकारी आलेले आहे. दलितविरुद्ध सवर्ण असा संघर्ष ही कथा चित्रित करते.

मानवाच्या विविध वृत्तीप्रवृत्तीचे चित्रण विजय जाधव यांच्या कथेतून व्यक्त होते. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य आणि दुष्काळ याचेही चित्रण विजय जाधव यांच्या कथेतून आले आहे. मराठवाडा आणि दुष्काळ हे काही मराठवाड्यासाठी नवीन नाही. शेतीत भागात नाही म्हणून अन्य व्यवसाय करणारी माणसेही आहेत. या कथासंग्रहातील प्रस्तावनेत भाष्य करताना डॉ. लुलेकर म्हणतात, 'एकंदरीत विजय जाधव यांची कथा ग्रामीण माणसाच्या जगण्याची कथा आहे. तेथील स्त्री - पुरुष सारेच शोषणाचे बळी आहेत. स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व नाही. तरीही त्या संसाराचा भार उचलताहेत. नवरा, सासू, सासरे, नणंद यांच्यामुळे शोषण होतेच आहे. अशा स्थितीत या स्त्रिया आपल्या नवऱ्याचा, पोराबाळांचा सकारात्मक विचार करतात. त्यांच्यासोबत निष्ठेने संसार करतात. ग्रामीण माणसाचे कष्टप्रद जीवन, त्याची सुख - दुःखे, त्याची विविध घटनांमधील घालमेल, नात्यागोत्यातील ताणताणाव, दारिद्र्य आणि दुष्काळातील परवड तरीही जगण्याची उमेद या साऱ्यांचे चित्रण ही कथा करते'. अगदी नेमकेपणाने विजय जाधव यांच्या कथेचे मूल्यमापन वरील विचारातून येते.

विजय जाधव यांच्या कथातील परिसर हा अंबड, जालना, उचेगाव, पैठण, गोंदी, चिंचोली, औरंगाबाद आहे. या परिसरातील गोदावरी नदीही आहे. या भागातील बोली कथेला लाभली आहे. गावगाड्यातील अठरापगड जातींचे चित्रणही कथेतून प्रकट झाले आहे. बोलीभाषेचा विचार केला तर बोलीभाषेतील योग्य शब्दांचा वापर केल्यामुळे कथेला एक परिणामकारकता लाभली आहे.

**उदा :** - वाऱ्यानं पावसाला हेलकावा द्यावा तसं झालं, गावाच्या जीवाचा चिखल झाला, वारा पिलेल्या खोडासारखं पाणी पुढेपुढे दुसऱ्या माराया लागलं, आपलंच नासं अन् जग हसं, नेमकीच उभारी धरणारं पीक सोपटून जावं तसं झालं, बोंड उलंना अन खिसा खुलंना, डोळ्यांचे बिरडे मोकळे होऊन आसवं धावत होती.

अशाप्रकारे बोलीभाषेतील शब्दांचा, म्हणींचा चपखल वापर केल्यामुळे कथेला एक उंची लाभली आहे. बदलत्या ग्राम जीवनातील सूक्ष्मातिसूक्ष्म बदलाची नोंद या कथासंग्रहातून आलेली आहे. समकालीन कालखंडात स्थूलांकडून सूक्ष्मतेकडे झालेला कथेचा प्रवास हा कथासंग्रह वाचल्यानंतर साक्ष पटते. अनुभवाची समृद्धता लाभलेला कथालेखक म्हणूनही विजय जाधव यांची नोंद घेता येईल.

**संदर्भ :**

१) दाखला : विजय जाधव, शब्द पब्लिकेशन हाउस, औरंगाबाद.
२) मराठवाड्यातील साहित्य : संपा. प्रल्हादजी लुलेकर, सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
३) १९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा : संपा. जयद्रथ जाधव, डॉ. भरत देशमुख, सक्षणा प्रकाशन, लातूर.
४) साठोत्तरी साहित्य प्रवाह : डॉ. प्रल्हाद लुलेकर, सायन पब्लिकेशन, पुणे.
५) ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास : संपा. डॉ. रामचंद्र काळुंखे, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.